मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०२३। पान १

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# सांस्कृतिक सपाटीकरण टाळण्यासाठी भाषा साहित्य जपा

## संस्कृतीचा ऱ्हास होताना दिसून येतोय : डॉ. राजा दिक्षीत

**मोशी।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

दिवसेंदिवस संस्कृतीचा ऱ्हास होताना दिसून येतोय. संस्कृतीचे सपाटीकरण रोखायचे असेल तर भाषा आणि संस्काराचे जतन केले पाहिजे. भाषिक, साहित्यिक, सुसंवाद ठेवला पाहिजे. त्यासाठी असे संमेलन होणे आवश्यक आहेत. संमेलनातून भाषेचा विस्तार आणि संवर्धन होते असे मत मराठी विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष डॉ.राजा दीक्षित यांनी व्यक्त केले.



इंद्रायणी साहित्य परिषद आयोजित, दोन दिवसीय इंद्रायणी साहित्य संमेलनाचे आयोजन मोशीतील जय गणेश बँकेट सभागृहामध्ये करण्यात आले होते. यावेळी डॉ.दीक्षित बोलत होते. यावेळी खासदार डॉ.अमोल कोल्हे, आमदार महेश लांडगे, संमेलनाध्यक्ष सोपान खुडे, जेष्ठ साहित्यिक डॉ. सागर देशपांडे, स्वागताध्यक्ष गणेश सस्ते, माजी संमेलनाध्यक्ष अरूण बोऱ्हाडे,इंद्रायणी साहित्य परिषदेचे अध्यक्ष संदीप तापकीर, मार्तंड देव संस्थान जेजुरीचे विश्वस्त ॲड. पांडुरंग थोरवे, माजी उपमहापौर शरद बोऱ्होडे, सामाजिक कार्यकर्ते संतोष बारणे यावेळी उपस्थित होते. डॉ. राजा दीक्षित म्हणाले, सध्याचे युग हे आधुनिकतेचे आहे असे म्हटले जाते, मात्र खरी आधुनिकता ही स्वातंत्र्य, समता, न्याय या तत्वांमध्ये आहे. एकीकडे साडेतीन टक्क्यांचे साहित्य म्हटलंय, साहित्यप्रवाह वृंदावत चाललय असे वाटते. सर्वांना सोबत नेणारे ते साहित्य असते. तसेच मन जोडणार, बदल घडविणारे आणि बंड करणार साहित्य आहे. संमेलनाध्यक्ष सोपान खुडे म्हणाले, मानवतेचं साहित्य निर्माण झाले पाहिजे. जात धर्माच्या पलिकडचा माणूस हा साहित्याचा केंद्रबिंदू असला पाहिजे. जगाच्या पाठीवर मोठा माणूस आहे. या देशामध्ये हिंदू, मुस्लिम, बौध्द , जैन, पारशी आहे, मग माणूस कुठं आहे. माणुस हरवला आहे, म्हणून साहित्यिकांनी आपल्या साहित्यात माणूस उभा केला पाहिजे.त्यासाठी विचारांची पेरणी केली पाहिजे. विचार पेरा म्हणजे माणसं उगवतील. माणसा इथे मी तुझे गीत गावे, असे गीत गावे, तुझे हित व्हावे, अशी भूमिका घेऊन मानवतावादाची निर्मळ साहित्य निर्माण करा असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. मोशीतील श्री नागेश्वर महाराज मंदीर मोशी ते पद्मश्री ना.धो.महानोर साहित्यनगरी संमेलन स्थळापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात आली. टाळ मृदुंगाचा निनादात ही दिडीं काढण्यात आली. या ग्रंथदिंडीचे पूजन ॲड. पांडुरंग थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले. संमेलनाचे नाव हे इंद्रायणी असे ठेवले. कारण मोशी परिसर हा इंद्रायणी काठावर आहे. मात्र इंद्रायणी नदीची दुर्दशा केवीलवाणी झाली आहे.

### माणूस कुठं आहे, माणुस हरवला आहे

**» जात धर्माच्या पलिकडचा माणूस हा साहित्याचा केंद्रबिंदु असला पाहिजे. जगाच्या पाठीवर मोठा माणूस आहे. या देशामध्ये हिंदू, मुस्लिम, बौध्द , जैन, पारशी आहे, मग माणूस कुठं आहे. माणुस हरवला आहे, म्हणून साहित्यिकांनी आपल्या साहित्यात माणूस उभा केला पाहिजे.त्यासाठी विचारांची पेरणी केली पाहिजे. विचार पेरा म्हणजे माणसं उगवतील. माणसा इथे मी तुझे गीत गावे, असे गीत गावे, तुझे हित व्हावे, अशी भूमिका घेऊन मानवतावादाची निर्मळ साहित्य निर्माण करा असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.**

# कारवाईत जप्त केलेल्या मशीनचा हडपण्याचा डाव?

## चौकशी सुरु करण्याचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले आदेश

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

अतिक्रमण कारवाईत जप्त केलेल्या भोसरी, एमआयडीसीतील एका कंपनीसमोरील बंद अवस्थेतील पाच फोर्क लिफ्ट मशीन जाणीवपूर्वक पाच महिने दुसरीकडे ठेवल्याने कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत कनिष्ठ अभियंत्याला निलंबित करण्यात आले. त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले.

संतोष दत्तात्रय शिरसाठ असे निलंबित केलेल्या कनिष्ठ अभियंत्याचे नाव आहे. शिरसाठ हे क क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत आहेत. त्यांच्याकडे बीट निरीक्षक, अतिक्रमण पथक प्रमुख जबाबदारी सोपविण्यात आली होती. चिखली, मोशीतील, अनधिकृत कच्ची, पक्की घरे, पत्राशेड, हातगाड्या, टप-या, पथारीवाले, फळ विक्रेते, किऑक्सवरील कारवाईसाठी नेमणूक केली होती. शिरसाठ यांनी भोसरी, एमआयडीसी




येथील एका कंपनीसमोर ब-याच वर्षांपासून बेवासरपणे लावलेल्या व बंद अवस्थेत असलेल्या ५ फोर्क लिफ्ट मशिनवर २५ मार्च २०२३ रोजी अतिक्रमण कारवाई केली. मशिन हस्तगत केल्या.या मशिन मोशीतील वाहनतळाच्या ठिकाणी जमा करणे आवश्यक व अभिप्रेत असताना जवळपास पाच महिने विलंबाने म्हणजे २७ ऑगस्ट २०२३ रोजी तक्रारीनंतर अण्णासाहेब मगर स्टेडियम येथे जमा केल्याचे दिसून येत आहे. यावरु शिरसाठ यांनी कारवाई करताना नियमित सूचनांचे पालन केल्याचे दिसून येत नाही. किंबहुना मशीन जाणीवपूर्वक क क्षेत्रीय कार्यालयाच्या आवारात ठेवल्याचे निदर्शनास येत आहे. कामकाजातील अनियमितता, तक्रारीच्या अनुषंगाने शिरसाठ यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली. पण, त्यांचा खुलासा संयुक्तिक नाही. त्यांनी कर्तव्यात नितांत सचोटी, कर्तव्यपराणता न राखता गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन केले आहे. याप्रकरणी त्यांची सचोटी अत्यंत संशयास्पद आहे. त्यांच्या गैरवर्तनामुळे कार्यालयीन शिस्तीवर गंभीर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव आहे. ते प्रत्यक्ष सेवेत राहिल्यास तपासात अडथळा निर्माण होण्याची भिती आहे. त्यामुळे उपलब्ध पुराव्यात फेरफार होऊ नये यासाठी शिरसाठ यांना निलंबित करण्यात आले. त्यांची विभागीय चौकशी सुरु केली आहे.

# शहरातील हवेच्या गुणवत्तेत झाली सुधारणा

## बांधकामे पुन्हा सुरू करण्यास महापालिकेने दिली परवानगी

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** हवेतील गुणवत्तेची पातळी गंभीर असल्याने महापालिका क्षेत्रातील बांधकाम व प्रक्रियेवर निर्बंध लागू करून १९ नोव्हेंबर पर्यंत कामे थांबविणेबाबत आदेश निर्गमित झालेले होते. तथापि १३ नोव्हेंबर रोजी प्रकाशित केलेल्या आदेशानुसार मुख्य हॉटस्पॉट आणि जंक्शनवर पाणी शिंपडणे आणि फॉगिंग उपक्रम तीव्र करून एअर क्वालिटी इंडेक्स कमी करण्यासाठी परिश्रमपूर्वक उपाययोजना केल्या आहेत, त्यामुळे गेल्या तीन दिवसांत पातळीसह सुधारणा झाली आहे, मागील गंभीर पातळीपेक्षा लक्षणीय घट झाली आहे. हे लक्षात घेऊन आणि ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅनचे पालन करून, बांधकाम व प्रक्रियेवरील बंदी याद्वारे मागे घेण्यात आली असल्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आज निर्गमित केले आहेत. त्यानुसार नागरी मर्यादेत काम पुन्हा सुरू होऊ शकते. तथापि, बांधकाम कंपन्यांना हवेच्या गुणवत्तेच्या पातळीबाबत जागरुक राहण्याचे निर्देशही याद्वारे देण्यात आले आहेत आणि ए क्यु आय पातळीमध्ये कोणतीही बिघाड टाळण्यासाठी योग्य उपायांची अंमलबजावणी सुरू ठेवली पाहिजे. पर्यावरण विभागाने नियुक्त केलेल्या भागात पाणी शिंपडणे आणि फॉगिंग उपाय सुरू ठेवणे आवश्यक असून अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी, कोणत्याही उल्लंघनासाठी महापालिकेची पथके त्यांच्या संबंधित प्रभागांवर सतत देखरेख ठेवतील अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली आहे.



# प्रसाद सस्ते यांची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड

## पिंपरी चिंचवडमध्ये राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेच्या निवड चाचणीत यश

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने धाराशिव येथे ६५ वी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा पार पडणार आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद यांच्या निरीक्षणखाली पिंपरी-चिंचवड येथे त्यासाठी निवड चाचणी कुस्ती स्पर्धा घेण्यात आली. पै. बाळासाहेब रामचंद्र लांडगे (वस्ताद) यांच्या ६९ वा वाढदिवसानिमित्ताने या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत ८१ खेळाडूंनी सहभाग घेतला. या मध्ये प्रसाद सस्ते हा महा केसरीचे मानकरी ठरला. पै. नितिन बाळासाहेब लांडगे, महेशदादा स्पोर्टस फाऊंडेशन, भवानी तालीमच्या वतीने याचे संयोजन करण्यात आले. पैलवान मारुती रावजी लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल भोसरी येथे या स्पर्धा पार पडल्या. पैलवान



किसन शंकर लांडगे यांच्या हस्ते उदघाटन झाले. आमदार महेश किसन लांडगे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक लक्ष्मण सस्ते, सागर गवळी, संतोष लोंढे, नंदकुमार लांडे, दत्ता गव्हाणे, दामोदर फुगे, मदन गव्हाणे, गणपत गव्हाणे, रंगनाथ फुगे, शिवाजी गव्हाणे, भगवान लोंढे, राजाराम फुगे, महाराज सोपान फुगे, बाळासाहेब गवळी, राजेंद्र लांडगे, विजय लांडगे,' मारुती लांडगे, शिवाजी लांडगे, ' पै. विनय लांडगे, पै. बाबा तांबे, माऊली कुटे', पंडित मोकाशी-बोराडे, बबन बोऱ्हाडे, योगेश लांडगे, तुळशिराम लोंढे, सुरेश लोंढे, हिरामण लांडगे, अनिल फुगे, सतीश गावडे, अनिल लोंढे, पप्पु काळभोर, ज्योती बारणे, भाऊसाहेब लांडे, कैलास माने, देवा माने, रतन लांडगे, लाला लांडगे, अंकुश लोंढे, किशोर नखाते आदींसह भोसरीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

नितिन लांडगे, नारायण लांडगे, विष्णु लांडगे, अजय लांडगे, स्वप्नील लांडगे, गणेश लांडगे, संतोष लांडगे महाराज, कालिदास लांडगे, राहुल गवळी, रूपेश जाधव आदींनी या निवड चाचणी स्पर्धेचे संयोजन केले. चंद्रकांत मोहोळ, रोहिदास आमले, निलेश मारणे यांनी पंच म्हणून काम पाहिले. महाराष्ट्र चॅम्पियन पुणे पोलीस पैलवान स्वप्नील लांडगे यांनी सर्व कुस्तीपटू व वस्ताद यांचे आभार मानले. गादी विभागात – ५७ किलो वजनी गटात प्रणव सस्ते, सुयस दास यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ६१ किलो वजनी गटात योगेश तापावर, प्रथमेश पाटील यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ६५ किलो वजनी गटात महेश जाधव, राहुल माने यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ७० किलो वजनी गटात परशुराम कँप, स्वप्निल सुकुंडे यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ७४ किलो वजनी गटात दिग्विजय काळे, अजिंक्य सांडभोर यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ७९ किलो वजनी गटात पवन माने याला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. ८६ किलो वजनी गटात सौरभ शिंगाडे, यश भोखे यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ९२ किलो वजनी गटात सौरभ जाधव, निरंजन बालवडकर यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळाला. ९७ किलो मध्ये शुभम गवळी याला प्रथम तर रणजीत मोकाशी याला द्वितीय क्रमांक मिळाला.

माती विभागात – ५७ किलो मध्ये श्री जाधव, महेश सलगर यांना यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ६१ किलो वजनी गटात अजिंक्य माचुडे रुद्र वाळुंजकर यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ६५ किलो मध्ये संकेत माने प्रथम तर अमित म्हस्के म्हस्के याला द्वितीय क्रमांक मिळाला. ७० किलो मध्ये किरण तळेकर, जय वाळके यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ७४ किलो मध्ये रवींद्र गोरेड कर्तिक फुगे यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ७९ किलो मध्ये अनिकेत लांडे प्रथम तर पृथ्वीराज जाधव याला द्वितीय क्रमांक मिळाला. ८६ किलो वजनी गटात यशराज अमराळे, विशाल कोळी यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ९२ किलो मध्ये विवेक शेलार, पवन चव्हाण यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ९७ किलो वजनी गटात तेजस फेंगसे, यश नखाते यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

# मराठा आरक्षण सोपा विषय नाही!

## आरक्षणाणसाठी मागासवर्ग आयोगाची भूमिका महत्त्वाची

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. मराठा आरक्षण हा विषय सोपा नाही. समाजाला आरक्षण मिळण्यासाठी शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास करावा लागेल, अशा शब्दांत स्वराज पक्षाचे प्रमुख माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी शनिवारी पुण्यात केली.



### विरोध करणारे वाढणार आहेत

» मला वाईट इतकंच वाटलं की, मी राज्य मागासवर्ग आयोगाला भेट दिली. माझी बैठक तेथेच होईल, असं मला अपेक्षित होतं. मात्र, मागासवर्ग आयोगाला दिलेलं कार्यालय १००० चौरस फूटही नसेल. त्यामुळे त्यांनी मला सर्किट हाऊसला बोलावलं. पुण्यासारख्या ठिकाणीही राज्य मागासवर्ग आयोगाचं कार्यालय एक हजार चौरस फूटही नाही. अशा स्थितीत ते सर्व्हे करणं, माहिती संकलित करणं अशी कामं कशी करू शकतात, असा प्रश्न संभाजीराजेंनी व्यक्त केलं.

राज्य मागासवर्ग आयोगाची शनिवारी शासकीय विश्रामगृहात बैठक बोलावली आहे. या बैठकीआधी संभाजीराजे यांनी आयोगाची भेट घेतली. त्यानंतर पत्रकारांशी ते बोलत होते. संभाजीराजे म्हणाले, की १५ दिवसांपूर्वी आयोगाला पत्र पाठवले होते. त्यानुसार शनिवारी पुण्यात बैठकीआधी आयोगाने वेळ दिली. आयोगासमोर मराठा समाजाचे काही प्रश्न मांडले. गरीब मराठा समाजावर अन्याय होत आहे. रोहिणी आयोगाची शिफारस, क्युरेटिव्ह याचिका कुणबी-मराठा, मराठा-कुणबी समाजाला सरसकट आरक्षण देता येते किंवा कसे? पोटजात मराठा यान अडेऊ शकता का? गायकवाड आयोगाने दिलेले पुरावे तपासले किंवा कसे? आदी मुद्द्यांवर चर्चा केली. आयोग स्वायत्त आहे, त्यावर कोणाचे बंधन नाही. मी समाजाच्या वतीने मांडलेल्या प्रश्नांची आयोगाने उत्तरे दिली नाहीत, मात्र या मुद्द्यांचा विचार केला जाईल, असे सांगितले. आयोगाच्या पुण्यातील कार्यालयाला मी भेट दिली. हे कार्यालय एक हजार चौरस फूट देखील नाही. त्यामुळे संग्रहित केलेली माहिती कुठे ठेवणार? त्यामुळे आयोगाला निधी मिळणे आवश्यक आहे. आयोगाला स्वतंत्र जागा देणे महत्वाचे आहे. मागासवर्ग आयोगाला सरकारने केवळ अधिकार, स्वायत्तता देऊन उपयोग नाही. पायाभूत सुविधा, आवश्यक मनुष्यबळ देणे गरजेचे आहे. तरच आयोग चांगल्या पद्धतीने काम करेल. असेही छत्रपती संभाजीराजे यांनी या वेळी सांगितले. संपूर्ण यंत्रणा दिल्याशिवाय आयोगाकडून शास्त्रोक्त पद्धतीने कामकाज होऊ शकणार नाही, असेही संभाजीराजे यांनी स्पष्ट केले. मराठा, ओबीसी एक राहिले पाहिजे. कोणीही असे वक्तव्य करू नये, जेणेकरून समाजात तेढ निर्माण होईल, असे आवाहन संभाजीराजे यांनी या वेळी केले. संभाजीराजे छत्रपती म्हणाले, १५ दिवसांपूर्वी मी राज्य मागासवर्ग आयोगाला पत्र लिहून भेटण्यास वेळ देण्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे त्यांनी आज पुण्यात बैठक असताना मला निमंत्रित केलं. म्हणून मी आज त्यांना भेटायला आलो. या बैठकीत मी समाजाचे १०-१२ प्रश्न मांडले. यात मराठा समाजाला आरक्षण कसे मिळू शकते, सर्वोच्च न्यायालयाचे आदेश कशाप्रकारे लागू होऊ शकतात, आरक्षणासाठीची आंदोलने अशा अनेक विषयांचा समावेश आहे. मला वाईट इतकंच वाटलं की, मी राज्य मागासवर्ग आयोगाला भेट दिली. माझी बैठक तेथेच होईल, असं मला अपेक्षित होतं. मात्र, मागासवर्ग आयोगाला दिलेलं कार्यालय १००० चौरस फूटही नसेल. त्यामुळे त्यांनी मला सर्किट हाऊसला बोलावलं. पुण्यासारख्या ठिकाणीही राज्य मागासवर्ग आयोगाचं कार्यालय एक हजार चौरस फूटही नाही. अशा स्थितीत ते सर्व्हे करणं, माहिती संकलित करणं अशी कामं कशी करू शकतात, असा प्रश्न संभाजीराजेंनी व्यक्त केलं. माझी सरकारला विनंती आहे की, सरकारने पैसे दिल्याशिवाय मागासवर्ग आयोग मजबूत होऊ शकणार नाही. आयोगाकडेच पायाभूत सुविधा नसतील, तर ते काम कसं करणार? आयोगाकडून काम करून घ्यायचं असेल, तर सरकारने ताबोडतोब आयोगाला पायाभूत सुविधा, कार्यालय, निधी दिला पाहिजे. सरकारने युद्धपातळीवर आयोगाला मदत केली पाहिजे. त्याशिवाय आयोगाला इंपेरिकल डेटा गोळा करायला लावण्यात अर्थ नाही.

# नामदेव जाधवांच्या तोंडाला फासलं काळं

## प्रदूषण रोखा अन्यथा काम बंद; महामेट्रोला दिला इशारा?

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी प्रसिद्ध वक्ते नामदेव जाधव यांच्या तोंडाला काळे फासल्याची घटना पुण्यात घडली. माध्यमांशी बोलत असतानाच पवार समर्थकांनी अचानक नामदेव जाधव यांच्या तोंडाला काळे फासले. यावेळी पोलिसांनी नामदेव जाधव यांचा बचाव करत घटनास्थळावरून त्यांना बाजूला नेले. पवार समर्थकांनी नामदेव जाधव यांच्या तोंडाला काळे फासत असताना पवारांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी केली. जाधवांना काळे फासण्यात



पवार गटाच्या महिला कार्यकर्त्यांचाही समावेश होता. नामदेव जाधव यांनी शरद पवार यांच्या जातीचा खोटा दाखला प्रसिद्ध केला होता. तसेच पवारांवर गंभीर आरोप केले होते. त्यानंतर ही घटना घडली आहे. नामदेव जाधव हे सातत्याने वादग्रस्त विधान करीत होते. त्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी भांडारकर प्राच्यविद्या संशोधन महाविद्यालय येथे होणाऱ्या नामदेव जाधव यांच्या कार्यक्रमाला विरोध केला. तसेच त्यांनी जाधव यांच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा दिला. यानंतर भांडारकर संस्थेने कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून नामदेव जाधव यांचा कार्यक्रम रद्द केला. त्याच दरम्यान नवी पेठेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नामदेव जाधव यांच्या चेहर्‍याला काळे फासले. याची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी स्वीकारली आहे. संवाध साधताना प्रशांत जगताप म्हणाले, या आंदोलनाची जबाबदारी आम्ही स्वीकारतो. नामदेव जाधवांना खंडणीच्या

### म्हणून जाधवांना काळ फासले

» लोकशाहीत टीका करण्याचा अधिकार नक्की आहे. पण, खऱ्या पुराव्यांच्या आधारावर टीका करावी. शरद पवारांवर नाहक खोटे आरोप करण्यात येत होते. नामदेव जाधवांना टीका करू नका, इसा इशाराही दिला होता. पण, ते थांबले नाहीत. म्हणून जाधवांना कार्यकर्त्यांनी काळ फासले, असं स्पष्टीकरण प्रशांत जाधवांनी दिलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी प्रसिद्ध वक्ते नामदेव जाधव यांच्या तोंडाला काळे फासल्याची घटना पुण्यात घडली. माध्यमांशी बोलत असतानाच पवार समर्थकांनी अचानक नामदेव जाधव यांच्या तोंडाला काळे फासले.

गुन्ह्यात विक्रोळी पोलिसांनी अटक केली होती. तसेच, पैसे घेऊन मुलांचे गुण वाढल्याप्रकरणी शाळेतून जाधवांची हकालपट्टीही झाली होती. आता जाधव शरद पवारांवर टीका करत आहेत.

# अखेर देहूच्या नगराध्यक्षांचा राजीनामा!

## डॉ. राजेश देशमुख यांच्याकडे अविश्वासाचा ठराव दाखल केला होता




**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मनमानी कारभार आणि नगरपंचायतीच्या आर्थिक व्यवहारामध्ये पारदर्शकता नसल्याचा दावा करत राजीनाम्याच्या दबावासाठी स्वपक्षीयांनी आणलेल्या अविश्वासाच्या ठरावानंतर अखेर देहूगावच्या नगराध्यक्षा स्मिता चव्हाण यांनी राजीनामा दिला. त्यामुळे अविश्वास ठराव मागे घेण्यात आला. मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वाखाली लढविलेल्या देहू नगरपंचायतीच्या पहिल्याच निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे १४, दोन अपक्ष नगरसेवक निवडून आले आहेत. सर्व सदस्यांचा गट जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये राष्ट्रवादी पार्टी या नावाने नोंदविण्यात आलेला आहे. सभागृहात भाजपचा एक सदस्य आहे. अनुसूचित जाती महिलेसाठी नगराध्यक्षपद राखीव झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्मिता चव्हाण यांची ११ फेब्रुवारी २०२२ रोजी नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली होती. सव्वा-सव्वा वर्षे नगराध्यक्षपद विभागून देण्याचे ठरले होते. ठरलेला कालावधी संपल्यानंतर नगराध्यक्षांनी राजीनामा देण्याची मागणी काही नगरसेवकांनी केली. मात्र, नगराध्यक्षा राजीनामा देत नसल्याने स्वपक्षीयांनीच अविश्वास ठराव आणला. नगराध्यक्षा चव्हाण यांच्या विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाच्या नऊ नगरसेवकांनी ९ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्याकडे अविश्वासाचा ठराव दाखल केला होता. अविश्वास ठराव दाखल झाल्यानंतर आमदार सुनील शेळके यांनी या प्रकरणात लक्ष घातले. ठरावावर स्वाक्षरी न करणाऱ्या नगरसेवकांनी तुम्ही घ्याल तो निर्णय आम्हाला मान्य असल्याचे आमदार शेळके यांना सांगितले. त्यामुळे हा ठराव बहुमताने मंजूर होण्याचा अंदाज नगराध्यक्ष चव्हाण यांना आला. त्यामुळे आमदारांच्या हस्तक्षेपानंतर त्यांनी नगराध्यक्षपदाचा राजीनामा जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविला. त्यानंतर तत्काळ अविश्वासाचा ठराव गैरसमजुतीने दाखल केला असल्याचे कारण देत माघारी घेण्यात आला.

# द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा

## द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे भेसळयुक्त रासायनिक खतामुळे मोठे नुकसान



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** बोरी (ता. इंदापूर) येथील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे भेसळयुक्त रासायनिक खतामुळे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहणार असल्याचे सांगून सदरच्या प्रकरणाची कृषी आयुक्तामार्फत चौकशी करुन दोषीवरती कडक कारवाई करण्याची मागणी राज्याचे माजी सहकारमंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते हर्षवर्धन पाटील यांनी केली.

बोरी (ता. इंदापूर) येथे भेसळयुक्त रासायिक खताच्या वापरामुळे ३३ शेतकऱ्यांचे सुमारे १५० एकर क्षेत्रातील द्राक्षबागांचे नुकसान झाले आहे. यासंदर्भात माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी आज शनिवार (ता. १८) रोजी नुकसानग्रस्त द्राक्षबागांची पाहणी करुन शेतकऱ्यांची भेट घेतली. यावेळी पाटील यांनी सांगितले की, शेतकऱ्यांची रासायनिक खतामध्ये फसवणूक झाली असून शेतकऱ्यांना भेसळयुक्त खत देण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. खतामध्ये तणनाशक असल्यामुळे शेतकऱ्यांना द्राक्षबागा काढाव्या लागणार असून शेतकऱ्यांना तीन ते चार वर्ष उत्पादन मिळणार नाही. सदरचा भेसळयुक्त प्रकार अंत्यत भयानक व गंभीर आहे. खत निर्मिती करणाऱ्या कंपनीवरती कडक कारवाई करावी.भेसळयुक्त खत निर्मिती करणारी कंपनी कोणाची आहे. त्याच्यामध्ये पैसे कुणी गुंतवले आहेत, त्यांना कोणाचा पाठिंबा आहे याची सर्व माहिती शेतकऱ्यांना आहे. मी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार असून शेतकऱ्यांना न्याय मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. यावेळी प्रगतशिल शेतकरी रामचंद्र शिंदे, कर्मयोगी सहकारी साखर कारखान्याचे संचालक वंसत मोहोळकर, अर्बन बँकेचे संचालक लालासाहेब सपकळ, तंटामुक्त अध्यक्ष रामेश्वर माने, माजी पंचायत समिती सदस्य निवृत्ती गायकवाड, रमेश शिंदे, गणेश शिंदे, दशरथ शिंदे, सुधाकर चांगण, महेश ठोंबरे, धनाजी सांगळे, दिनकर शिंदे उपस्थित होते. यासंदर्भात हर्षवर्धन पाटील यांनी तातडीने राज्याचे कृषी आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याशी दुरध्वनीवरुन संपर्क साधला. त्यांना बोरीमधल भेसळयुक्त खतामुळे नुकसान झालेल्या प्रकाराची माहिती नसल्याचे सत्य समोर आले. पाटील यांनी सांगितले की, संबधित घटनेमध्ये लक्ष घालून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी गेडाम प्रयत्न करणार असल्याचे सांगितले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी संबधित भेसळयुक्त रासायनिक खत निर्मिती करणाऱ्या संबधित कंपनीवरती स्वतंत्र गुन्हे दाखल करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली.